# विचारशलाका

संपादक : प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३४ वे, ऑक्टोबर २०१९ ते जून २०२०
जोड अंक १३२, १३३ व १३४ वा
ISSN 2229-7901



# महात्मा बसवेश्वर विचारविश्व विशेषांक

ISSN 2229-7901

# विचारशलाका

संपादक : प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३४ वे, ऑक्टोबर २०१९ ते जुन २०२०, जोड अंक १३२, १३३ व १३४ वा

वार्षिक वर्गणी : रु. ६००/-, त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/-,
सहावार्षिक वर्गणी : रु. ३६००/-, या अंकाचे मूल्य : रु. ४५०/-

संपादक :

**नागोराव कुंभार**

**संपादन सहाय्य :**

डॉ. राजशेखर सोलापुरे, प्रा.डॉ. म.ई. तंगावार
डॉ. विजयकुमार काशीनाथ करजकर

**संपादक मंडळ :**

सूर्यनारायण रणसुभे
अशोक चौसाळकर
हरिदास फेरे
भारती पाटील
श्रुती तांबे
विवेक घोटाळे
रणधीर शिंदे
प्रकाश कुंभार
विवेक सौताडेकर
ग्यानदेव उपाडे

**संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
'आई', शिवनगर, सूतमिल मार्ग,
लातूर - ४१३ ५१२, दूरध्वनी : (०२३८२) २४८१६७,
भ्रमणध्वनी : ९४२२९४९९६६,
E-mail - kumbharnl@gmail.com
Watsapp. No. - 8805982828

☐ मुद्रक व मुखपृष्ठ डिझाइन : स्नेहा ऑफसेट, लातूर

☐ या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक, संपादकमंडळ व मुद्रक सहमत असतीलच, असे नाही.

ISSN 2229-7901

# विचारशलाका

संपादक: प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३४ वे, ऑक्टोबर २०१९ ते जुन २०२०, जोड अंक १३२, १३३ व १३४ वा

## ॥ महात्मा बसवेश्वर विचारविश्व विशेषांक ॥

## ॥ अंतरंग ॥

१. म. बसवेश्वर : बंडखोर संत
*एच. तिप्पेरुद्रस्वामी* / १

२. समग्र युगपुरुष म. बसवण्णा आणि त्यांची वचने
*डॉ.एम.एस. कलबुर्गी* / १४

३. महात्मा बसवेश्वर : सामाजिक क्रांतीचे अग्रदूत
*डॉ. जनार्दन वाघमारे* / २१

४. बसवण्णांची पुनर्रचनेची मूल्यछावणी
*यशवंत मनोहर* / ३८

५. महात्मा बसवण्णांविषयी एक मुलाखत
*आ.ह. साळुंखे* / ४९

६. महात्मा बसवेश्वरांच्या वचनातील सुभाषितं
*प्रा.डॉ. इरेश सदाशिव स्वामी* / ५९

७. महात्मा बसवेश्वर
*भालचंद्र शिंदे* / ६८

८. महात्मा बसवेश्वर व मी
*डॉ. अशोक कुकडे* / ७८

९. बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिकता
*डॉ. शोभा नाईक* / ८१

१०. बसवण्णा आणि वर्तमान
*प्रा. राजा शिरगुप्पे* / ९४

११. महात्मा बसवेश्वर
*डॉ. नलिनी वाघमारे* / १०४

१

# बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिकता

■

**डॉ. शोभा नाईक**

बसवेश्वर हे बाराव्या शतकात होऊन गेले. बंडखोर संत म्हणून त्यांची ओळख महत्त्वाची. समाजशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, भक्तशिरोमणी, तळागाळातील शोषित वर्गाबाबत अतीव कळवळा राखणारे महामानव ही सुद्धा त्यांचीच ओळख. एकीकडे ते भक्तीभंडारी म्हणवून घेतात आणि दुसरीकडे समाजाच्या डोळ्यात जळजळीत ज्ञानाचं अंजनही ते घालतात. तथाकथित उच्चकुलीन समाज आणि तळागाळात ढकललेला समाज या दोन्ही वर्गांना उद्देशून आत्मोद्धाराचा अतिशय आवश्यक आणि योग्य असा मार्ग ते प्रस्तुत करतात. त्यांनी सांगितलेली सर्व सूत्रे आजही प्रासंगिक ठरतात. विशेषतः 'धर्म' हेच हुकमी शस्त्र बनलेल्या काळात तर बसवेश्वर अधिकच प्रस्तुत ठरतात.

भारतात मध्ययुगीन काळात अत्यंत महत्त्वाची अशी धर्मक्रांती अवतरली. बसवेश्वर यांच्या समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे ती सिद्ध झाली. भारतात सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, नैतिक आणि सांस्कृतिक या सर्व पातळ्यांना हवी असणारी जाग त्यातून निर्माण झाली. वास्तविक या सर्व पातळ्यांच आवश्यक ते परिवर्तन त्यांनी चिंतलेल होत. समाजाला बदलण्याची हाक देणारे त्यांचे विचार कालबाह्य होणारे नाहीत.

व्यक्ती आणि समाज यांच्यातील अभेद्य नात बसवेश्वरांनी विचारात घेतलेल होत. समाजान रुढ व जाचक व्यवस्थेतून मुक्त होऊन स्वावलंबी व परोपकारी अर्थकारणाची आवश्यकता लक्षात घ्यावी हा त्यांचा आग्रह होता. प्रस्थापित भेदाभेद धुडकावून देण्याची सामर्थ्य आपल्या आस्थेच्या परिघात घेण्याची प्रेरणा त्यांनी प्रस्तुत केली होती. मानवी समाजाला नेमकेपणान पुढे जाण्यासाठी मार्गदर्शक अशीच त्यांची तत्त्व होती. आजही त्या तत्त्वांची निकड कमी झालेली दिसत नाही.

आपल्याकडे जीवनाला धार्मिकतेच्या संस्कारांवर संवेदनांवर उभं करण्याचे

पायंडे आहेत. त्यामुळे त्या संस्कार अथवा संवेदना शुद्ध करून घेण्यासाठी बसवेश्वर यांनी टाकलेल पाऊल मुलभूत निश्चितपणानं आहे. त्यात त्याची माणूस ह्या प्राण्याबाबतची आस्था प्रश्नातीत आहे.

भारत ही भूमी धर्मकेन्द्री भूमी असून इथं धर्म आणि धार्मिक तत्त्वज्ञान यांची समांतर वाटचाल अव्याहत स्वरुपात चालत असल्याच आपण पाहतो. पण आज आपण एकविसाव्या शतकात आहोत. तंत्रशास्त्रान कमालीचे शोध लावलेले असल्यान आज संपूर्ण जग एका हाकेवर आलेल्या शतकात आपण आहोत. भौतिक सुबत्ता व जागतिकीकरणाचे पर्यावरण यांच प्राबल्य निर्माण झालेल्या दिवसांत आपण आहोत. मात्र काहीस सूक्ष्मतेनं पाहू लागलो की अस्तित्वात असणाऱ्या कमतरता दृष्टीस पडतात. केवळ भौतिक सुबत्तेच्या माग वेड्यासारख धावू लागलेल्या बलाढ्य देशांची मानसिक अस्थिरता, नैतिक अधोगती, भ्रष्टतेच्या विळख्यात सापडलेल पर्यावरण दृष्टीआड करता येत नाही. तर आजकाल वाढलेली गुन्हेगारी व युवा पिढीच व्यसनांच्या जाळ्यात भयावहपणे अडकण हे सर्व सकारात्मक वास्तव आपण पाहात आहोतच.

भौतिक सुखांच्या नादाला लागलेला मानव जे काही निर्माण करत आहे ते पाहता पृथ्वीवरच प्राणीमात्रांच अस्तित्व त्याला टिकवायच आहे की नाही असा प्रश्न पडतो. अशा वेळी संत वाङ्मयान मध्ययुगीन काळात अस्तित्त्वात आणलेला जागर आपल लक्ष्य वेधतो. अशावेळी प्रामुख्यान बसवेश्वर यांनी भारतीय संत जाणिवेतील सामाजिकतेची जी मुहूर्तमेढ रोवली तिच स्मरण प्रकर्षान केल पाहिजे.

संत बसवेश्वर यांचा जन्म इ.स. ११०५ मध्ये झाला तर मृत्यू इ.स. ११६७ मध्ये असे सांगतात. कन्नड भाषा संस्कृतीतील धार्मिक पातळीला स्वच्छ करून घेण्यासाठी धडपडणारा प्राण त्यांच्या रुपात अवतरला. अर्थात हा प्राण बंडखोर होता. त्यांच्या स्पंदनांतून केवळ कन्नडच नव्हे तर एकूणच भारतीय पारंपरिक धर्म व ज्ञान परंपरांचा चेहरा पारदर्शक स्वरूपाच्या आरशासमोर आला. त्यातून उठून दिसणाऱ्या खाचाखोचा अधोरेखित झाल्या. बुद्धानंतर पुन्हा एकदा भारतीय समाजाची धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक तसेच राजकीय पातळी चिकित्सेच्या ऐरणीवर आली. फक्त ऐरणीवर न राहता ती प्रत्यक्ष समाजात उतरली.

इंग्रजांच्या काळात साकारलेल्या धार्मिक, सामाजिक सुधारणा बसवेश्वर यांच्या कृतिमोहीमेवाटे बाराव्या शतकातच अवतरलेल्या होत्या. समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही आधुनिक म्हणवली जाणारी मूल्ये त्यांच्या वैचारिकतेच्या केंद्रवर्ती होती. याची नोंद म. गांधीजीनी बेळगावच्या काँग्रेस अधिवेशनात केलेल्या भाषणात सविस्तरपणे दिलेली

होती. बसवेश्वर यांची ती तत्त्वे देशी कळवळ्यातून जन्मलेली आहेत. त्यांच्या तात्त्विक भूमिकेत परकीयांच्या प्रमाणे कोणताही राजकीय स्वार्थ असण्याचा प्रश्नच नाही.

आजच्या घडीला बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिकता लक्षात घेताना अर्थातच वर्तमान काळाच्या सत्ताकेंद्री वातावरणाकडे आपले लक्ष जाते. दिवसेंदिवस जात जाणीव अधिकाधिक दृढ व विकृत बनत चालली आहे की काय असा संभ्रम आपल्याला व्यापू लागतो. म.बसवेश्वर यांनी जाती अंताचा व समानता अस्तित्त्वात आणण्याचा लढा पुकारला होता. त्यांची आठवण प्रकर्षाने होते. त्यांनी लावून दिलेला दलित आणि ब्राह्मण जातीतील मुलांचा विवाहही आठवू लागतो आणि त्यांच्यावर प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकावर बंदी आणली गेली ही अलीकडची घटनाही लागलीच आठवते. सामाजिक परिवर्तनाची ठोस कृती त्यांनी केलेली होती. त्या पुस्तकातील त्यांच्या जन्मा (जाती) संबंधातील उल्लेखाने विचारांचे उलटसुलट भोवरे आजच्या समाजात निर्माण केले जातात हे पाहून अंतर्मुखता प्राप्त होते. तात्पर्य अशा तऱ्हेच्या पर्यावरणात त्यांच्या विचारांची प्रासंगिकता हा विषय अधिकच गांभीर्य धारण करतो.

वास्तविक त्यांची वचन पुनःपुन्हा आठवावी व त्यावर सखोल चिंतन व्हाव. प्रस्थापित प्रतिष्ठांच्या बेड्यांतून समाजाला मुक्त करण्याच त्यांचे पाऊल नीट विचारात घ्याव. पण रूढ शोषक सामाजिकतेच्या बंधनात टाकणाऱ्या जन्माबाबतची व्यवस्थाच उखडून टाकण्याचा त्यांचा विचार अत्याधुनिक जगालाही पेलेल की नाही कोण जाणे! त्यांनी एकीकडे म्हटलंय, "मातंग चन्नय्यांच्या घरचा दासपुत्र / डोहर कक्कय्यांच्या घरची दासीपुत्री / गेले होते गोवऱ्या वेचण्या शेतात / तेथे त्या दोघांनी केला संग / त्यांच्या पोटी झाला माझा जन्म / कुडलसंगमदेव यास साक्षी" स्वतःच्या जन्माची, त्यांच्या वैचारिकतेच्या जन्माची त्यांनी अशी प्रतिमा रेखणे ही गोष्ट कमालीच्या आस्थेतून प्रकटते. जाती अंताचा त्यांनी केलेला असा प्रयत्न आजच्या दिवसांनाही थक्क करेल अशा तऱ्हेचा आहे. त्यांच्या प्रयत्नांना खरोखर तोड नाही!

म.बसवेश्वर यांना प्रामुख्यान धर्मसंस्थापक म्हणून ओळखल जात. एका अत्यंत महत्त्वाच्या समताधिष्ठित समाजशील तत्त्वज्ञानाच्या भूमिकेत ते वावरले. समाजाला त्यांची तत्त्वे मान्य होती पण त्यांच्या उच्चकुळाविषयी शंका घेणे मान्य होत नाही, या आजच्या मजेशीर वास्तवाचा वेध बसवेश्वर कसा घेतील त्याची कल्पना आपल्यालाच करावी लागेल!

म.बसवेश्वर यांनी आपल्या वचनांच्या माध्यमातून समाजात दृढ केल्या गेलेल्या अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी, पुरोहितशाही, काल्पनिक धर्मग्रंथ, जातिभेद, स्त्रीदास्य

यासारख्या अनेक विषयांवर प्रहार करणारे क्रांतिकारक विचार समाजासमोर ठेवलेले आहेत. सर्व प्रकारचे भेदाभेद दूर करण्याचे प्रयत्न त्यांनी केले आहेत.

"हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा ऐसे म्हणू नये
हा आमुचा, हा आमुचा, हा आमुचा ऐसेचि म्हणावे.
कूडलसंगमदेवा, तुमच्या घरचा पुत्र म्हणवावे."

अशा सहजपणे त्यांनी समाजात एकमेकाकडे पाहण्याची समत्वाची दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजात जातिभेद दृढ करणाऱ्या कर्मकांडे केंद्रवर्ती ठेवणाऱ्या वेद संस्कृतीला त्यांनी विरोध करणारी वचन प्रसवली. भेद संस्कृतीला प्राधान्य देणाऱ्या पारंपरिकतेला दूर सारणार त्यांच लेखन आजही स्फूर्तीदायक ठरत. शोषित माणसाला आपला आधार वाटला पाहिजे, त्याला आपल्याविषयी आत्मीयता वाटली पाहिजे हे तत्त्व आजही महत्त्वाचेच ठरत नाही का ? ते एकीकडे म्हणतात,

"वेदावर प्रहार करेन
शास्त्राला कोंडीत पकडेन
तर्कशास्त्राच्या पाठीवर आसूड ओढेन
आगमशास्त्राचे नाक कापेन
मी मातंग चेन्नयाचा प्रिय आहे, कूडलसंगमदेवा."

या वचनात मातंग चेन्नय्या या समाजातील अत्यंत खालच्या जातीत ढकलून दिलेल्या माणसाला बसवेश्वर वर उचलून घेताना दिसतात. शोषित घटकाच्या अंतरंगात आपल या प्रकारचं स्थान निर्माण करण हेच लक्ष्य ठेवण्याची प्रेरणा ते देतात. या वचनात बसवेश्वर अगाध महनीय ठरतात ! आपली पात्रता केवळ शोषिताच्या आपल्याविषयीच्या भावनेवरून ठरवावी हे त्यांनी प्रस्तुत केलेल प्रामाण्य अचंबित करते !

त्याच कारणान त्यांनी मंदिर संस्कृतीलाही विरोध केला. कारण तिथूनच सर्वसामान्य बहुजन समाजाच शोषण सुरु होत हे त्यांच्या लक्षात आल. समाजाला अंधश्रद्धांचे वळण लावण्यासाठी मंदिरातील वापरला जाणारा देव त्यांनी अमान्य केला. देवाच्या भेटीसाठी या प्रकारच्या मंदिरात जाण्याची आवश्यकता नसल्याचं ते सांगू लागले. खुद्द देवच त्यांनी भक्ताच्या करस्थलावर दिला. देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ कसे व ते का श्रेष्ठ याची गाथा त्यांनी उलगडून दिली. ज्याची आजही गरज संपलेली नाही.

बसवेश्वर होऊन गेले त्याला आता आठशे वर्षे झाली. त्यांनी शरण संप्रदायाची स्थापना केली. वीरशैव तत्त्वज्ञानातून पुढे आलेली त्यांची ही शाखा लिंगायत धर्माची

स्थापना करून गेली. उपनिषद, आगमशास्त्र (शैवागम), होमहवन, संस्कृत इ. वीरशैवांना मान्य असते पण लिंगायत ते मान्य करत नाहीत. लिंगायत धर्म तत्त्वज्ञान बसवेश्वर यांच्यापासून आकारते. बसवेश्वर यांच्यात देशीयता ओतप्रोत भरलेली आहे.

बसवेश्वर यांनी ब्राह्मण धर्मातून पुढे आलेले आगमशास्त्र धुडकावले. उच्चकुलीन म्हणवणाऱ्यांच्या धर्मातील ह्या गोष्टी आपण मान्य करायच्या नाहीत तर त्यापासून आपण वेगळे व्हायचे, ही भूमिका त्यांनी घेतली. स्वतःला त्यांनी नेहमी तळागाळातील लोकांबरोबर ठेवले. प्रस्थापित धर्म संकल्पनेविरुद्ध जाऊन तळागाळातील सर्वांसाठी लिंगायत धर्म उपलब्ध केला. वैदिकांना विरोध केला. नवा धर्म स्थापन केला. जर बसवेश्वर यांच्या विचारांच्या पावित्र्याचे तंतोतंत पालन झाले तर निश्चितपणे त्यातून एक अत्यंत संपन्न समाज आकारास येऊ शकतो. पण आता जातीयवादी (communal) समाज निर्माण झाल्याचे चित्र दिसू लागले आहे. या परिस्थितीत जर आपल्याला बदल करायचा असेल तर अर्थातच पुन्हा बसवेश्वर यांचीच तत्त्वप्रणाली स्वच्छ व नितळ मनाने आत्मसात करावी लागेल. अगदी संक्षिप्तपणे सांगायचे झाले तर समाजात अराजकता माजली असेल तर तिथे बसवेश्वर हे प्रासंगिकच ठरतात.

पारंपरिक भारताची दीर्घकालीन वाटचाल धार्मिक सूत्रातून झालेली वाटचाल आहे. येथे वैदिक, बुद्ध, जैन, ब्राह्मण, इस्लाम, ख्रिश्चन इ. धर्म वाटचाल करत आले. मुळात या भूमीतून उगवलेले धर्म आणि या भूमीवर बाहेरून येऊन नांदत असलेले धर्म असे साऱ्या घटनांचे एकत्रित वाटचालीचे सहसंबंधांचे वास्तव आपल्याकडे निर्माण होत गेले. मुळात भारतीय भूमीत निर्माण झालेल्या धर्म पंथांमध्ये वेळोवेळी परितर्वने घडण्याच्या सकारात्मक शक्यताही अस्तित्त्वात येत गेल्या. मानवी समाज हा नेहमी कोणत्या ना कोणत्या तत्त्वांच्या आधारेच मार्गक्रमण करत असतो. तो जसा विकसित होत जातो तसे यामध्ये वेगवेगळे पंथ अस्तित्त्वात येतातच. अगदी सुरुवातीला तो खूप लहानसा समाज असतो. जो भारतात सुरुवातीला शैव अद्वैतवादी तत्त्वज्ञान अनुसरणारा होता. पुढे तत्त्वज्ञानात बदल घडत राहिले. अनेक शाखा उपशाखांची गर्दी निर्माण झाली. या गर्दीतूनही अनेकवेळा अनागोंदी निर्माण होत असते. यातूनही अनेकविध जातीपातीत विखुरलेले समाज वास्तव निर्माण होते. शोषक शोषित संबंध निर्माण होतात. शोषित वर्गाला शोषकांच्या अर्थ व्यवहार व सामाजिक पत प्रतिष्ठा या धारणांखाली अनेक शतके पिचत पडावे लागले. हळूहळू सर्वांचेच माणूसपणाचे स्मरण सुटले. एकतर माणसे गुलाम होऊन गेली नाहीतर शोषक तरी होऊन जगू लागली. शोषितांसाठी देवांची आणि सत्ताधिशांची गुलामी हाच जगण्याचा मंत्र बनून गेला आणि शोषक वर्ग

शोषितांना गुलामगिरीच्या धर्मात ढकलून धार्मिक अनुष्ठानात, यज्ञयागादी कर्मकांडात व्यग्र बनून गेला. शोषक आणि शोषित या दोन्ही वर्गांसाठी पुष्कळ प्रमाणातील नियोजन पुरोहितवर्गाकडे चालत आले. जे जोमाने केले जात होते. राजाच्या दरबारातील कारभारी असणाऱ्या हेमाड पंडित लिखित चतुर्वर्गाचिंतामणी सारखा दोन हजार व्रतांची माहिती देणारा त्या काळात निर्माण झालेला मराठी ग्रंथ या प्रकारच्या पर्यावरणाची साक्ष ठरतो.

बसवेश्वर यांनी समाजात चालू असणाऱ्या या अनागोंदीला दूर सारू बघितले. एक सुटसुटीत तत्त्वज्ञान की जे माणूसपणाची निरोगी सृष्टी निर्माण करेल ते प्रस्तुत करण्याचे प्रयत्न केले. त्यांची ही सृष्टी मानवतेच्या आधारावर उभी राहणार होती. सर्व प्रकारचे प्रस्थापित भेदाभेद त्यातून नष्ट करण्याची धारणा निर्माण होणार होती. त्यासाठी सर्वप्रथम त्यांनी समाजातील हे तीन वर्ग नेमके लक्षात घेतले. एरवी शोषक शोषित असे फक्त उल्लेखले जाते. पण बसवेश्वर यांनी सूक्ष्मतेने वास्तवावर बोट ठेवले. त्यातून त्यांनी राज्य करणारे सत्ताधीश, त्यांना मदत करणारे पुरोहित आणि जातीपातीच्या शकलांमध्ये विखुरलेली अठरापगड शोषित माणसे हे चित्र अचूक हेरले.

या तिन्ही वर्गासाठी किंवा अगदी सर्वांसाठीच त्यांनी परिवर्तनाचे मंथन प्रवृत्त करण्यासाठी 'अनुभव मंटप' या विद्यापीठाचे अस्तित्व आकारास आणले. त्यांच्या वचनांकडे दृष्टिक्षेप टाकता या सर्व गोष्टी स्पष्ट होतात. समाजाचे बसवेश्वर यांनी केलेले आकलन खूप अचूक ठरते. सत्तांध प्रवृत्ती छाटून टाकणे सोपे नाही हे जाणून त्यांनी तळागाळातील विविध जाती जामतीत; तुकड्या तुकड्यात विभागून गेलेला कष्टकऱ्यांचा समाज लिंगायत या एका छत्राखाली घेण्याचा प्रयत्न करून बघितला. (त्यानंतर मराठी समाज संस्कृतीत म. जोतिबा फुले यांनी याच प्रकारे सत्यशोधक समाज अस्तित्त्वात आणण्याचा प्रयत्न करून पाहिला.) ज्यांनी बसवेश्वर यांची तत्त्वे मान्य केली त्यांनी लिंगायत धर्मात प्रवेश केला. त्यांची माणूसपणाची भूमिका पाहण्यासारखी असून अर्थातच ती केव्हाही अप्रस्तुत न ठरणारी आहे.

आजच्या जातीयवादी पर्यावरणात तर म.बसवेश्वर अधिकच प्रस्तुत ठरतात. म.बसवेश्वर नाकारणारे आणि स्वीकारणारे अशा दोन्हीही पंथांनी त्यांच्याकडे नीट पाहण्याची निर्माण झालेली नितांत गरज अधोरेखित करावी लागेल. म.बसवेश्वर यांनी धर्म केंद्रवर्ती न ठेवता नेहमी माणूसच आपल्या चिंतनाच्या, प्रज्ञेच्या मध्यवर्ती ठेवला. त्यामुळेच तर ते नेहमी महान ठरतात. खरेतर माणूस वगळून उभा राहिलेला धर्म जर केंद्रवर्ती येईल तर तिथे अस्वस्थता ही येणारच. पण जर तिथे माणूस केंद्रवर्ती असेल तर शांती प्रस्थापित होण्यात कोणताही अडथळा येणार नाही. शेवटी माणूसच महत्त्वाचा

आहे. मग तो कोणत्याही ज़ातीचा, धर्माचा वा भाषेचा अथवा संस्कृतीचा राहूदे. त्याच्या कल्याणाकरिता, उद्धाराकरिता हाती घेतलेले कार्यच महत्त्वाचे. जात, धर्म, भाषा, संस्कृती या घटकांपेक्षाही माणूसपण महत्त्वपूर्ण; असे सांगणारे बसवेश्वर आजच्या अराजक माजलेल्या ज़गात म्हणूनच अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

उद्योग आणि अर्थशास्त्र बदलले की समाज बदलतो. प्राचीन काळात फक्त कृषी आणि राज्य करणे इतकेच पर्याय उपलब्ध होते. पण आधुनिक काळात विकासाच्या नावे कारखानदारी आली. विविध उद्योग आले. पण हा विकास मात्र एकाच बाजूने सुरु झाला. त्यातून पुन्हा शोषित वर्ग मोठ्या प्रमाणात अस्तित्त्वात आला. उत्पादन वाढलेले असले तरीही आपण मानसिक पातळीवरून अजूनही मागासलेलेच राहिलो. म.बसवेश्वरांच्या व आपल्या काळादरम्यान बरेच अंतर कापले गेलेय. जगण्यात तंत्रशास्त्रीय शोधांमुळे खूप गोष्टीत फरक पडत आलाय. पण हे सर्व बाह्य रुपातील बदल आहेत. आतून मानसिक पातळीवरून आपण खरेतर काही फारसे बदलून गेलो आहोत असे दिसत नाही. मानसिक पातळीवरून आपण अजून बाराव्या शतकातच आहोत जणू. कारण अजूनही समाजातील जातीयता, श्रेष्ठ कनिष्ठता, धार्मिक रीती-रिवाज, लिंगभेद हे प्रकार नाहीसे झालेले नाहीत.

भारतीय वाटचालीतील धार्मिक संप्रदाय तसेच वर्णाश्रम व्यवस्थेतील चातुर्वर्ण्य पद्धती या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या, रूढ झालेल्या व्यवस्था आहेत. आज राजकीयतेने लोकशाही पद्धत स्वीकारलेली जरूर आहे. पण खऱ्या अर्थानं लोकशाही आलेली आहे का हा प्रश्न पडावा असं पर्यावरण सभोवताली आहे. गरीब व कष्टकरी वर्गाच्या सोयीसाठी कोणती यंत्रणा राबवली जाते हे प्रश्न विचारून वास्तवावर लक्ष केंद्रित केलं तर काय दिसतं ?

आपल्या देशात आर्थिक व्यवस्थेत बदल येतो आणि अधिकारही पूर्वी दुय्यम असणाऱ्यांच्या हातात जातो. त्यातून दुय्यम स्थानावरचे श्रेष्ठ पदावर पोहोचतात... असं वरवर दिसलं तरी तो एक चकवाच असतो. म.बसवेश्वर यांच्या दृष्टीचा आजच्या लोकशाहीशी संबंध कुठे पोहचेल ? ज्यास अधिकार मिळतो त्याला चढणारी झिंग दृष्टीआड करता येईल का ? आजच्या लोकशाहीतही जातीयताच अधिक वाढत निघालेली का दिसते ? म.बसवेश्वर यांच्या दृष्टीतील लोकशाही आणि आजची निवडणुकीच्या राजकारणातून चालवली जात असलेली लोकशाही यांच्यात तुलना होऊ शकते का ?

म.बसवेश्वर जातीची प्रतिष्ठा धिक्कारुन, मिळालेल्या राजकीय सत्ताधिकाराचा वापर करत शोषितांच्या बाजूनं उभं राहून अधिकाराचं विकेंद्रीकरण करण्याची दिशा

देणारं तत्त्वज्ञान प्रस्तुत करतात. जातीयता नाहीशी व्हावी हे स्वप्न बाळगून त्या दृष्टीतून ते पावले टाकतात. पुढ ती स्वप्न राजकीय घटनेच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकार करण्याचे दिवस निर्माणही झाले. पण प्रत्यक्षात व्यवहार काय सांगतो हा वेगळा प्रश्न आपल्यासमोर आजही आहेच... कोणताही राजकीय पक्ष सत्तेत आला तरीही आपल्यासमोर हे प्रश्न असतातच... तर यातून मार्ग कसा काढायचा ? समाजवाद्यांनी यावर काही विचार करण्याचा प्रयत्न केला होता. मधु दंडवते, सुंदरलाल बहुगुणा, जयप्रकाश नारायण इ. नेत्यांनी समाजातील अर्थ पातळीसंदर्भातून काही जाणिवा निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. आर्थिक पातळी फक्त आपण विचारात घेऊ अस सुचविण्यात आलं. फक्त जातीनुसारच सवलतींचा विचार करावा हे योग्य होईल की नाही ? त्यापेक्षा आर्थिक परिस्थितीचा विचार करावा का ? गरीब पातळीवर बीपीएल कार्ड वगैरे देता येईल... असं उलटसुलट विचारात घेतल होत. पण कितीही केल तरी, स्वकीय सरकार कार्यरत आहेत तरीही भारतीय समाजाचे प्रश्न अजूनही संपलेले दिसत नाहीत. जोवर प्रश्न संपत नाहीत तोवर म.बसवेश्वर प्रस्तुत ठरतील. कायक श्रम हेच सर्वस्व म्हणणारे, अर्थ व्यवहाराला विकेंद्रित करू पाहणारे, दासोह सारखी सामाजिक कर्तव्यनिष्ठा शिकवणारे संत बसवेश्वर विस्मरणात जाऊ नयेत.

म.बसवेश्वरांनी वर्णाश्रमपद्धती नको, जातीयता नको, कर्मकांडे नकोत अस म्हटल होत. त्यातील शोषणाचा बंदोबस्त करण्यासाठी अत्यंत तीव्र पावलंही उचलली होती. 'वेद सारे चुलींत घाला' इतका त्रागाही त्यांनी व्यक्त केला होता. प्राचीन काळातील ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आलेल्या समाजाला त्यांनी ज्ञानाशी जोडून देण्याच ठोस पाऊल उचलल होत. त्यासाठीच त्यांची अनुभव मंटप हे केंद्र प्रस्तुत झालेल होत. सर्वसामान्य समाजाला श्रेष्ठ ज्ञानाशी जोडून घेण्याची निकड आजही आहेच. शिवाय ज्ञान आणि प्रत्यक्षातील अनुभव यांची त्यांनी घातलेली सांगड आजही अन्वर्थकच.

म.बसवेश्वर हे समाज सुधारक होते. समाज सुधारकाचे स्वागत कधी होते का? उलट त्याला विरोधच तर होत असतो. अशा वेळी गांधीजी चटकन दृष्टीसमोर येतात. मध्ययुगातील चक्रधर, तुकाराम, एकनाथ अशी काही उदाहरणे आहेतच आपल्या समोर. अगदी आजही तेच होताना आपण पाहतोय. त्यामुळे समाज बदलत निघाला असं म्हणतानाही रोख बसत जातो...

बाराव्या शतकापासून ते विसाव्या एकविसाव्या शतकातही हेच सुरु आहे. विरोध, हिंसा यांचे अस्तित्व आपण पाहतो आहोतच. बसवेश्वर यांच्याही मागे राजा बिज्जलाच सैन्य लागल. त्यांच्यापासून सुटका मिळविण्यासाठी त्यांना पलायन कराव

लागल. त्यातच त्यांनी कूडलसंगम येथे समाधी घेतली. पण या सर्व गदारोळात एका महत्त्वाच्या तत्त्वज्ञान्यास आपण मुकतो. नंतर त्यांची नीट ओळख व्हावी तर दरम्यान तीनशे वर्षे जावी लागतात! बसव पुराण आल्यावर लोकांना म.बसवेश्वर यांचा परिचय होतो. त्यातून त्यांच्या नंतर तीनशे वर्षाच्या अंतराने त्यांच्या विचारांनी भारलेला एक ज्ञानी समाज अस्तित्त्वात येतो व बसव धर्म स्थापन केला जातो.

लिंग धारण करणारा तो लिंगायत नव्हे तर बसव धर्माची तत्त्वे आचरणारा लिंगायत अशी धारणा रूढ झाली. काही ब्राह्मण कुळातील लोकांनीही हा धर्म स्वीकारला. या धर्मात जातीयता नाही, होम हवन नाही, कर्मकांडे नाहीत, बलीप्रथा नाही, बालविवाह नाही. अनिष्ठ रूढींच्या विरोधात ती क्रांती होती. पारंपरिक वैदिक समाजाला बसवेश्वर विरोध करतात. वेदमान्य समाज हा त्या काळात स्वतःही कर्मकांडात फसला होता व इतरांवरही कर्मकांडांचा आरोप त्यान चालविला होता. राजेही त्यांच म्हणण मान्य करत. वास्तविक म.बसवेश्वर कोणत्याही राज पद्धतीविषयी बोलत नाहीत. तर सामाजिक आणि धार्मिक दृष्टिकोन कसा असला पाहिजे याचा ते विचार करतात. त्यांच्या धर्मकेंद्री काळात धर्माचरण कसं करावं हा त्यांच्या समोर मुख्य प्रश्न होता. कर्मकांड धरून धर्माचरण करायचं की कर्मकांड सोडून धर्माचरण करायचं ? याचा छडा लावताना त्यांनी छळवाद मांडणार कर्मकांड नको हे निश्चित केलं. मंदिर संस्कृती बदलून देण्याच पाऊल उचलल. भक्ती महत्त्वाची आहेच पण त्यासाठी दगडातील देवाची पूजा करण्यासाठी देवळात जाण्याची गरज नसल्याच त्यांनी सांगितल. देवच त्यांनी भक्ताच्या करस्थलावर ठेवला. कायक हीच लिंगपूजा असा कर्म सिद्धांत त्यांनी प्रस्तुत केला. तुझे जे काम (श्रम) आहे ना तोच कैलास आहे असं त्यांनी समाजाच्या मनावर बिंबवलं. केवळ धार्मिकतेच्या नावाखाली निष्क्रिय होऊन बसलेल्या समाजाला त्यांनी सक्रिय करू पाहिलं. प्रत्येकाला अधिकाराचा स्वामी होता येत. पण काम करणाऱ्यालाच अधिकार मिळतो. अधिकारासाठी काम करावं अशी तात्त्विकता त्यांच्या म्हणण्यात आहे. पुढ मार्क्स कष्टकरी समाजाला बरोबरीची प्रतिष्ठा देण्याची जी दृष्टी आणतो त्याच प्रमाण म.बसवेश्वर यांनी श्रम केन्द्रीत्व हेच तत्त्व केंद्रवर्ती ठेवलं.

आध्यात्मिक आनंदाशी म.बसवेश्वर कामाचा मोबदला जोडून देतात हे आजच्या भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या जगाला पटवून देण्याची वेगळी गरज निर्माण झाली आहेच. आपल्या श्रमामुळेच मानवी समाजाला बळ प्राप्त होत आणि आपला समाज कोणत्याही राजाच्या उपकाराशिवाय उत्तमपणे कालक्रमण करू शकतो हे म्हणण त्यामध्ये दडलेल आहे. श्रमाला महत्त्व असल्याच हे अधोरेखन म.बसवेश्वर यांनी केल

ते याच कारणासाठी. राजाच्या तिजोरीवर समाजान भार का व्हाव ? त्यापेक्षा आपण इतक निर्भर व्हाव की दासोह या मार्गान कर्तव्य पूर्ततेचा स्वामीही होता येईल. व्यक्तीन समाजावर भार होऊ नये उलट समाजासाठी आधाराचा खांब बनून राहाव हे त्यांनी सांगितलेल तत्त्व कधीतरी जुन होईल का ?

वास्तविक बुद्ध हाच विचार देतो. बुद्धाचीच वैचारिकता बसवेश्वर यांनी प्रमाण मानली. त्यांनी साकारलेली लिंग ही प्रतिमा अद्वैत तत्त्वज्ञांनाची एक प्रतिमा आहे. त्यांनी प्रस्तुत केलेली लिंगपूजा म्हणजे जुना हठयोग सहजतेत परावर्तीत करण्याची ती प्रक्रिया आहे. हठयोगातही ध्यान व धारणा आहे. पण त्यात जे क्रौर्य आहे ते बाजूला सारून त्यांनी त्यात सहजता आणली. लिंगरूपात देवच हातात घ्या आणि त्यावर ध्यान केंद्रीत करा, तुमचे कर्म हीच लिंगाची पूजा होय. जीवरूपातील जन्म मिळाल्यावर अन्न, वस्त्र, उद्योग आवश्यक ठरतो. समाजात त्या गरजा कशा भागतील याचा विचार करून आपण समाजावर अधिकचा भार न होता उलट तो भार दूर करण्यासाठी कर्म कराव. तुझे काम हीच पूजा आहे अस तत्त्वज्ञान यांनी सांगितल. व्यक्तीला स्वावलंबी करण्याची ही दिशा होती. उत्पादन करण्यातून बळ प्राप्त होईल आणि समाजालाही त्या बळामुळे संपन्नता येईल. व्यक्ती आणि समाज यांच्यात असा अन्वर्थक स्वरूपाचा घनिष्ठ संबंध असल्याच ते सर्वप्रथम अधोरेखित करतात. समाजास संपन्न करण्यातील आनंद व्यक्तीन मिळवायला हवा हा त्यांचा आग्रह कालबाह्य न होणारा आहे.

बसवेश्वर यांनी समन्वय साधलेला दिसतो. अर्थात त्यांच हे धोरणही आजच्या काळाला संयुक्तिक ठरणार आहे. आध्यात्मिक दृष्टीतून बसवेश्वर षटस्थळ सिद्धांत सांगतात. ही स्थळे योगिक प्रक्रियेतून निर्माण झालेली आहेत. ती वैदिक पद्धतीनुसार आहेत पण त्यांची नावे मात्र वेगळी आहेत. ही सर्व योग पद्धती त्यांनी हिंदू संस्कृतीतून घेतलेली आहे. वास्तविक त्यांनी साधलेला हा समन्वय आज अन्वर्थक ठरतो. आजचं पर्यावरण समन्वयाशिवाय किती घातक बनत चाललंय हे वेगळ सांगायला हव आहे का ? तर अवैदिक म्हणून बसवेश्वर यांनी लिंगायत पद्धत पुढ आणली. पण कर्मकांडाशिवाय जे जे वैदिक पद्धतीत आहे ते त्यांनी स्वीकारलं. वैदिकांची कर्मकांडे मात्र त्यांनी पूर्णपणे अव्हेरली. षटस्थळ वैदिक पण तरीही लिंगायत अवैदिक. बसवेश्वरांनी साधलेला हा समन्वय मोठा रोचक आहे. त्यातील अनुष्ठान पद्धती म्हणजे पूजा पद्धती जी आहे, कर्मकांडाशिवाय जे जे आहे ते सारे वैदिक पद्धतीनुसारच आहे. पण त्याला धरून बसवेश्वर राजकीय पातळीची निर्मिती मात्र करत नाहीत ! त्यांना फक्त गरिबांचे कष्ट आणि कर्मकांडात त्यांच भरडल जाण इतकंच दिसत. त्या काळातील गरीबी भयावह

स्वरूपाची होती. शरण संप्रदायाचा अनुयायी असणाऱ्या आयदक्की मारय्याच उदाहरण पाहिल की याची कल्पना येईल. आयदक्की मारय्या नावाचा हा भक्त रोज रस्त्यावर पडलेले तांदूळ वेचून आणत असे आणि त्यावर त्याची गुजराण चाले. त्या काळात गरिबांचे असे भयानक शोषण सुरु होते. बिज्जळ हा जैन राजा त्यावेळी राज्य करत होता. त्याच्या राज्यात धार्मिक प्रक्रियेतील कर्मकांड चाले. क्रूरतेसाठी मोठा प्रसिद्ध असा तो राजा होता. तो सुरुवातीला मंगळवेढ्याला होता. तिथून कल्याणला येऊन त्यान आपल राज्य स्थापन केल. म.बसवेश्वर यांच्या बुद्धिमत्तेमुळे बिज्जळान आपल कोषाध्यक्षपद त्यांच्याकडे सोपवल. पण मुळात करुणेचा झरा म.बसवेश्वरांच्या हृदयात वाहता असल्यामुळे त्या पदावरून कार्य करताना तेथील गरीबी, जातीयता, शोषण पाहून त्यांच्यातील क्रांतिकारक कार्यरत होत गेला.

समाजात परिवर्तन आणलंच पाहिजे, हे त्यांना प्रकर्षानं जाणूव लागलं. त्या काळात परिवर्तन म्हणजे अर्थात धार्मिक प्रक्रियेत बदल. कारण तो समाजच धर्मकेंद्री होता. त्यामुळे म.बसवेश्वर यांचेही धार्मिक प्रक्रियेकडे लक्ष गेले. खाजगी कर्मकांड धर्माच्या नावाखाली वाढलेली होती. ती बंद करण्याच पाऊल त्यांनी उचलल. आजचं वर्तमान यापेक्षा काही खूप वेगळ आहे असं नाही. आज धर्माच्या नावाखालची वैयक्तिक कर्मकांड कमी झालेली असली तरी राजकीय कर्मकांड मात्र वाढलेली असल्याचं वास्तव दिसत आहे. घरीदारी वैयक्तिक श्राद्धादी क्रियाकर्म इ. सोडून दिलेलं असेल, पूजापाठ, होमहवन इ. कमी झालेल असेल, घर बदललेल दिसेल आपल्याला. मात्र कौटुंबिक पातळीवरुन बाजूला झाल्यावर दृष्टीस पडणारी सामाजिकता पाहिली तर तिथं काय दिसतं ? राजकीय घडामोडीतून जातीपातींच्या गठ्ठाभर मतांच उत येणार राजकारण. धर्माच्या नावाखाली जातीपातीची कर्मकांडे आज वाढलेली दिसताहेत. तेव्हा या नव्यान निर्माण झालेल्या शोकात्मिकेत सुधार आणण शक्य होतंय का ?

शिक्षणक्षेत्राच्या माध्यमातून या संदर्भातून अपेक्षा ठेवता आल्या असत्या. लहान मुलांपासूनच हे ज्ञान देण्याचं व्रत घेता आल असत. म.बसवेश्वरांचे प्रबुद्ध विचार त्यांच्या अंतःकरणात मुरवता आले असते. म.बसवेश्वर यांच्या दृष्टीतून धर्म म्हणजे फक्त नैतिकता. म.बसवेश्वर यांनी घराघरात जाऊन नैतिकतेचे पाठ द्यायला सुरुवात केली होती. वैदिकांनी श्रीमंतांसाठी केलेली कर्मकांडं सामान्य लोकांवरही जेव्हा लादायला सुरुवात झाली तेव्हा त्यातूनच गरीब जनतेचे अतोनात हाल सुरु झाले होते. धार्मिक कर्मकांडांची सक्ती केल्यावर धर्माचीच भीती समाजात निर्माण झाली होती. बुद्धानेही हीच परिस्थिती ओळखून कर्मकांडाविरोधी भूमिका घेतलेली होती. म.बसवेश्वर यांनीही

तीच भूमिका घेत त्यातून नैतिकतेच्या जागृतीचा मार्ग प्रस्तुत केला. लहानथोर सर्व एक व्हा रे हे त्यांचं आवाहन अत्यंत संयुक्तिक आहे.

एकूण धर्मवेड या घटकासंदर्भातील परिस्थिती दोन्ही काळात सारखीच आहे. धार्मिक कर्मकांडांची बजबजपुरीच करण्यात आली होती. वर्णाश्रम पद्धतीत धर्माचच भय झाल होत. त्या काळात स्वीकार हेच मूल्य महत्त्वाच बनल होत. बुद्धाच्या काळात, शंकराचार्य व म.बसवेश्वर यांच्या काळात जी जातीयता व धर्माच्या संकल्पनेच अस्तित्त्व होत त्यापेक्षा अधिक गोंधळात टाकणार वातावरण आज निर्माण झालेल आपण पाहतो. नैतिक भूमिकांचा भयावह ऱ्हास दृष्टीस पडत आहे. ज्याच्याकडे पैसा व जात आहे तोच आज निवडून येत आहे. जात आणि पैसा केंद्रवर्ती मानला जात असलेल्या दिवसात म.बसवेश्वर सांगत होते तो धर्म प्रस्तुत ठरेल की नाही ? त्यांनी सांगितलेल्या धर्मतत्त्वांची अनन्यता न संपणारीच यात शंका घेता येणार नाही. वास्तविक समाज बदलला पाहिजे हेच धार्मिक तत्त्वज्ञानाचही ध्येय असत. पण जात हा दृढ होत गेलेला घटक यात अडसर निर्माण करतो. आज जातीय राजकारणाच्या दिवसांच्या पर्यावरणाकडे नीट पाहता काय दृष्टीस पडत ? शोषित घटकाचा उद्धार झालाय का पूर्णपणे ? शोषण समाजातून पूर्णतः बाजूला पडलेल आहे का ? शोषण विरहीत समाज हेच आजच आपल स्वप्न आहे की नाही ?

कन्नड भाषा संस्कृतीत मध्ययुगीन काळात अस्तित्वात आलेल्या महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची प्रासंगिकता आपण अत्यंत संक्षिप्त स्वरुपात विचारात घेतली. म.बसवेश्वर हे कन्नड भाषेत निर्माण झालेले संत असूनही आपण त्यांचा विचार मराठी भाषेतून केला. ही वास्तविक अनेक अर्थानं वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट ठरते. कन्नड आणि मराठी या भाषा व संस्कृतींची वाटचाल वास्तविक एकमेकींच्या सोबतीन झालेली वाटचाल आहे हेच यातून प्रतीत होईल. शिवाय एकमेकांकडून काही महत्त्वाची देवघेव करण्याच्या प्रवृत्तीचीही ती साक्ष ठरेल. मराठी व कन्नड या दोन्ही भाषांनी आपल्या बुलंद वाटचालीतून भारतीय पातळीला व्यक्तिमत्त्व प्रदान करताना विशेष भूमिका निभावलेल्या आहेत. मराठी भाषेत साहित्याची निर्मिती मजबुतीनं जी झाली त्याला कारणीभूत असणारे चक्रधर आणि त्यांचा महानुभाव पंथ हा बसवेश्वर यांना अगदी लगटून आलेल्या पुढील दिवसांचा आविष्कार आहे. त्याच्या नंतर येणारा वारकऱ्यांचा आविष्कारही खूप अंतरावरचा नाही. समाजाच्या सद्‌गतीची जबाबदारी कितीही नाही म्हटलं तरी लिहिणाऱ्या माणसावर येतेच, त्यामुळे त्याच्या बोलांना वचन म्हणायच असत, शोषिताचे कष्ट दूर करण्याच्या कार्याला एकदा शब्द दिला की दिला, त्यात बदल नाही ही साहित्यान राखायची

कटिबद्धता म.बसवेश्वर आपल्या लेखनातून प्रसवतात. याच प्रकारची भूमिका अठरापगड समाजाला धर्माचे खरे सार कळाव म्हणून आपल्या शिष्यांची फळी निर्माण करणारे, धर्मात, देवाच्या संकल्पनेत सुधारणा करून देण्याचा प्रयत्न करणारे, प्रस्थापित व्यवस्थेला बगल देऊन समत्वासंदर्भातील निराळी वैचारिकता व समाजाला आपण देणे लागतो ही दृष्टी प्रदान करणारे चक्रधर, बसवेश्वर यांच्याच शतकात अवतरलेले आहेत. बसवेश्वर हे चक्रधर आणि ज्ञानेश्वर यांच्या आधी काही दशके होऊन गेलेले आहेत. पण त्यांच्या स्वतंत्र व बंडखोर भूमिकेची ओळख कन्नड साहित्याला तीनशे वर्षानंतर झाली. मात्र त्यांच्या प्रत्यक्ष समाजातील कार्याच्या अस्तित्वाचे पडसाद या दरम्यानच्या तीनशे वर्षाच्या काळात चक्रधर, गोविन्दप्रभू व महानुभावीय साहित्य तसेच ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ ही बंडखोर पण तरीही समन्वय साधणाऱ्या संतांचे अस्तित्व मराठी समाजात कार्यरत राहिले. हे समन्वयवादी वास्तव अर्थातच कन्नड व मराठी यांच्यातील सहसंबंधाचं स्वरुप आपल्यासमोर ठेवेल. म्हणूनच माणुसकी जतन करू पाहणाऱ्या धर्माच सूत्र घट्ट करणारे म.बसवेश्वर यांच प्रेरक अस्तित्व कालबाह्य कधीच होणारं नाही. पण त्यांच्या कट्टर धर्मांध अशा काळातही त्यांनी जातीबाहेर जाऊन समाजात मूलभूत बंधुभाव निर्माण करण्याच जस धाडस दाखवल; तस आजच्या युगात संघटित होऊन प्रयत्न करताना आपण का दिसू नये ? समर्थ समजल्या जाणाऱ्या विचारवंतांनी समाजधुरिणांनी आज प्रगत व मोकळ्या विचारपीठावर (अनुभव मंटप) येऊन जाती बाहेर जाऊ शकलेल्या माणूसपण जगत असलेल्या कुटुंबांचा शोध घेण्याच निराळ पाऊल का उचलू नये ? वरवरच्या दुटप्पी सुधारणांचे देखावे आपण बंद करून अस्सल मोकळ माणूसपण का फुलवू नये ? असं जर करू शकलो तरच आजही म.बसवेश्वर आपल्यात जीवंत आहेत असं म्हणता येईल!

- शोभा नाईक
पटवर्धन लेआऊट, प्लॉट नं. ४०,
गणेश नगर, माधवपूर, वडगाव,
बेळगाव - ५९० ००५
मो. - ०९४४८९८९४००

□□□